3 त्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स

प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक २६७ वा ● मंगळवार, ता. १८ मार्च २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

रयत समाचार पोर्टल
Scan QR Code
रयत समाचार चॅनल
Scan QR Code
इंग्रजी रयत समाचार वाचण्यासाठी
Scan QR Code

१ एप्रिल २०२५ पासून पुर्णवेळ आपल्यासेवेत...
श्रीलक्ष्मी होमिओपॅथिक क्लिनिक
डॉ. विद्या गायकवाड | 7588092673
वेळ : सकाळी ११ ते दुपारी ३, संध्याकाळी ५ ते रात्री ९
पत्ता : दर्पण बिल्डिंग, श्रीपाद मेडिकलच्यावर, शनी-मारुती मंदिराशेजारी, दिल्लीगेट वेशीच्या बाहेर, अहिल्यानगर-४१४००१
कृपया, फोन करुन येणे
सर्व आजारांवर होमिओपॅथिक औषधोपचार केले जातील
आजाराचे निदान व समुपदेशन केले जाईल

# शिक्षणक्षेत्रातील झुंडशाही मोडीत काढा!

## पुरोगामी संघटनांची जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांकडे मागणी

**सांगली। प्रतिनिधी**

शिक्षण क्षेत्रात झुंडशाही करणाऱ्या समाजकंटकांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करून ही झुंडशाही मोडून काढावी अशा मागणीचे निवेदन आज जिल्हाधिकारी आणि पोलीस प्रमुख यांना सांगली शहरातील विविध पुरोगामी संघटनांच्या शिष्टमंडळाने दिले. या निवेदनात म्हटले आहे की, परवा रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील पब्लिक स्कूल, शिंदे मळा, सांगली येथे काही समाजकंटकांनी महिला प्राचार्यांच्या केबिनमध्ये अनाधिकाराने घुसून ''आम्ही तुम्हाला जाब विचारायला आलोय, तुम्ही शाळेतील मुलांना शूज घालून येण्याची सक्ती करत आहात. तुम्हाला संभाजी महाराजांचा बलिदान मास पाळायचा माहित नाही का?'' असे म्हणून जोरदार गोंधळ घातला. त्यामुळे महिला शिक्षिक वर्ग, विद्यार्थ्यांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले. पुढे जाऊन या समाजकंटकांनी शालेय विद्यार्थ्यांना काही बाबी अनाधिकाराने विचारून त्यांना शिक्षिकांचे नाव व त्यांच्या जाती याची विचारणा केली. तसेच शाळेच्या परिसरात मुलांना थांबवून त्यांच्या शैक्षणिक कामकाजात अडथळा आणून धार्मिक प्रार्थना घेतली. यादरम्यान संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मा. ॲड अजित सूर्यवंशी हे आले असताना, त्यांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी त्यांचे



ऐकून न घेता दंगा तसाच चालू ठेवून ॲड. अजित सूर्यवंशी यांच्या अंगावर धावून गेले. निवेदनात पुढे म्हटले आहे की, वरील परिस्थितीत आपण ज्या समाजकंटकांनी अनाधिकृतपणे शाळेच्या आवारात घुसखोरी (ट्रेसपास) करून प्राचार्या आणि शिक्षकांच्या वर भीतीचे वातावरण तयार केलेले आहे, ही घटना अत्यंत गंभीर आहे. अशा परिस्थितीत यामध्ये सहभागी असणाऱ्या सर्वांचे वर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी आमची मागणी आहे. संबंधित घटनेचे सी.सी.टीव्ही फुटेज या तक्रारी अर्जासोबत आपले माहितीसाठी आणि योग्य ती कारवाई करण्यासाठी जोडलेली आहेत. तरी आपण दहशतवाद गाजवणाऱ्या समाजकंटकांवर कारवाईचा बडगा उगारावा अशी विनंती आहे. तसेच या समाजकंटकांकडून रयत शिक्षण संस्थेतील महिला शिक्षिका आणि विद्यार्थी यांना धोका आहे. त्यामुळे या शाळेस पोलीस संरक्षण द्यावे अशीही आमची मागणी आहे. यावेळी जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी पुरोगामी संघटनांच्या शिष्टमंडळाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि या घटनेबाबत योग्य ती चौकशी करू असे आश्वासन दिले. तसेच जिल्हा पोलीस प्रमुख संदीप घुगे यांनी सदर घटनेची चौकशी करून योग्य ती कायदेशीर कारवाई करू असे शिष्टमंडळाला सांगितले. पुरोगामी संघटनांनी दिलेल्या या निवेदनावर रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य एडवोकेट अजितराव सूर्यवंशी, किसान सभेचे राज्याचे अध्यक्ष कॉ. उमेश देशमुख, शेतकरी कामगार पक्षाचे भाई दिगंबर कांबळे, संभाजी ब्रिगेडचे डॉ. संजय पाटील, मराठा सेवा संघाचे अमृतराव सूर्यवंशी, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राहुल थोरात, जगदीश काबरे, राष्ट्र सेवा दलाचे सुभाष कुलकर्णी, जनता दलाचे डॉ. जयपाल फराटे, जनार्दन गोंधळी यांच्या सह्या आहेत.

# दूधसागर नदीवर पर्यटकांची गर्दी



**फोंडा । प्रतिनिधी**

धारबांदोडा पंचायत क्षेत्रातील ताकार-दावकोण व ओकांब येथील दूधसागर नदीवर उष्णतेपासून बचावासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. होळी साजरी करून पर्यटकांनी दारूच्या नशेत नदीवर धिंगाणा घातला. रात्री उशिरापर्यंत काही जण दारूच्या नशेत नदीच्या काठावर झोपलेल्या स्थितीत होते.पुढील काही दिवसात आणखी पर्यटकांची गर्दी वाढण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी परिसरात गस्त घालण्याची मागणी स्थानिक लोकांकडून होत आहे. दूधसागर नदीवर उभारण्यात आलेल्या बंधाऱ्यावर सुट्टीच्या दिवशी पर्यटकांच्या गर्दीत वाढ दिसून येत आहे. ताकार-दावकोण येथील दूधसागर नदीवरील बंधाऱ्यावर पर्यटकांची गर्दी स्थानिक लोकांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. यापूर्वी नदीवर पाण्यात बुडून बळी जाण्याचे प्रकार घडल्याने स्थानिक भीती व्यक्त करत आहेत. ताकार-दावकोण येथील दूधसागर नदीवर शुक्रवारी मोठी गर्दी बंधाऱ्यावर दिसून आली. गरमीचा पारा वाढल्याने बंधाऱ्यावर पर्यटकांची संख्या वाढत आहे. कित्येक पर्यटक दारूच्या नशेत आंघोळ करीत असतात. त्यावेळी दारूच्या बाटल्याही नदी काठी फोडण्यात येत असल्याचे दिसून आल्या. यापूर्वी बंधाऱ्याजवळ कित्येक पर्यटकांचा बुडून मृत्यू झालेला आहे. गेल्यावर्षीही एका युवतीचा बंधाऱ्याजवळ पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. त्यामुळे भविष्यात बुडून दगावण्याचे प्रकार थांबविण्यासाठी आवश्यक उपाय करण्याची गरज आहे. त्यासाठी पोलिसांनी गस्त घालून पर्यटकांना समज देण्याची आवश्यकता आहे.

ओकांब येथील दूधसागर नदीवर शुक्रवारी मोठी गर्दी दिसून आली. दारूच्या नशेत व संगीताच्या तालावर पर्यटकांनी परिसरात धिंगाणा घातला. शुक्रवारी दिवसभरात हजारो पर्यटकांनी नदीवर जाऊन आंघोळ केली. दूधसागर नदीवर एक प्रकारे जत्रेचे स्वरूप शुक्रवारी दिवसभरात पाहण्याची वेळ स्थानिक लोकांवर आली. संध्याकाळी परिसरात पाहणी केली असता परिसरात कचऱ्याचे ढिगारे दिसून आले. तसेच अनेक जण झाडाच्या दारूच्या नशेत झाडांच्या झुडपात झोपलेले दिसून आले. रात्री ८ वाजेपर्यंत कित्येक पर्यटक परिसरात दारूच्या नशेत धिंगाणा घालत असल्याची माहिती स्थानिक लोकांकडून मिळाली आहे. फेब्रुवारी महिन्यात याच ठिकाणी एका युवकाचा बुडून मृत्यू झाला होता. त्यामुळे पोलिसांनी परिसरात सुट्टीच्या दिवसात गस्त वाढविण्याची मागणी स्थानिक लोकांकडून होत आहे.

# कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांचा निर्धार

## पुण्यात कृषी आयुक्तालयावर धडक

**श्रीरामपुर । शफीक बागवान**

राज्यभरातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या कर्जमाफीच्या लढ्यासाठी '' चलो पुणे'' हा निर्धार घेतला असून, ॲड. अजित काळे यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकरी १९ मार्च रोजी कृषी आयुक्त कार्यालय, पुणे येथे धडक देणार आहेत. या ऐतिहासिक आंदोलनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यांतून शेतकरी स्वखर्चाने गाड्यांची नोंदणी करत असून,

**''हा लढा आपल्या हक्काचा आहे. प्रत्येक शेतकऱ्याने आपले कर्तव्य समजून पुण्याला यावे, असे ॲड. अजित काळे यांनी स्पष्ट केले. येत्या १७ व १८ मार्च दरम्यान प्रत्येक जिल्ह्यातून नियोजन पूर्ण करून सर्वांनी १९ मार्चला पुण्यात दाखल व्हावे, असे आवाहन करण्यात आले.**



अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी देखील या लढ्यात आपला सक्रिय सहभाग निश्चित केला असल्याची माहिती शेतकरी संघटनेने दिली आहे. राज्यातील शेतकरी वर्ग हा सरकारच्या फसव्या आश्वासनांना कंटाळला आहे. कर्जमाफी, हमीभाव आणि शेतकऱ्यांच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न या मुद्द्यांवर सरकारने दखल न घेतल्याने शेतकरी रस्त्यावर उतरण्यास मजबूर झाला आहे. या आंदोलनाला मिळणारा प्रतिसाद पाहता, हजारोंच्या संख्येने शेतकरी स्वतःच्या खर्चाने वाहने ठरवून पुण्याला जाण्यासाठी सज्ज आहेत. सरकारला खडसावणारा एल्गार! ''शेतकऱ्यांचा प्रतिनिधीच कृषी मूल्य आयोगावर असायला हवा. अजित काळे यांची नियुक्ती तिथे करावी, अशी ठाम मागणी करतो. या मागणीला सरकारने गांभीर्याने घेतले नाही, तर शेतकरी अधिक तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा यावेळी दिला जात आहे.

# पहिला रोजा : शेख सिदरा फातेमा

**अहमदनगर । प्रतिनिधी**



बाबा बंगाली येथील प्रसिद्ध इलेक्ट्रीशियन शेख शेरअली यांची मुलगी शेख सिदरा फातेमा वय वर्षे सात हिने रमजान चा पहिला रोजा पुर्ण केला. सिदरा फातेमा ही मुकुंदनगर येथे मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू हायस्कुल मध्ये पहिलीत शिकत आहे. त्याने एवढया कडक उन्हात व एवढे कमी वयात रोजा केल्याबद्दल त्याचे सर्व शिक्षक नातेवाईक अल करम सोसायटी तर्फे कौतुक होत आहे.



# सावली येथे लघुउद्योग मार्गदर्शन सत्र

**अहमदनगर । प्रतिनिधी**

संकल्प प्रतिष्ठान संचालित केडगाव सावली येथे महिला दिनानिमित्त विशेष लघुउद्योग मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्रासाठी नक्षत्र फूड प्रॉडक्ट च्या संचालिका, महिला उद्योजिका स्नेहल धर्माधिकारी यांनी महिलांना स्वयंरोजगार आणि उद्योजकतेच्या विविध संधींबाबत माहिती दिली. कार्यक्रमात महिलांसाठी उपलब्ध असलेल्या लघुउद्योग संधी, व्यवसाय सुरू करण्याच्या प्रक्रिया, आवश्यक कौशल्ये आणि शासकीय योजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. महिलांनी या सत्रात उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि विविध शंका विचारून व्यवसाय संधींबाबत अधिक माहिती मिळवली. बीपीएचई सेंटर फॉर स्टडीज इन रुरल डेव्हलपमेंट, सोशल वर्क आणि रिसर्च इन्स्टिट्यूट येथील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. संस्थेचे अध्यक्ष नितेश बनसोडे यांनी मार्गदर्शन केले.

महिन्याला एक प्रशिक्षण घ्यायचे असे महिलांनी या निमित्ताने निर्धार केला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी महिला स्वावलंबनाच्या दिशेने पहिला टप्पा म्हणून अशा सत्रांचे महत्त्व अधोरेखित केले.महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी अनोखा जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन शिवानी शिंगवी, ओम गासे, उमा टेकाम,शुभम चातुरकर व मानसी कोंड्याल यांनी केले. ओम गासे यानी आभार मानले.

# मराठी पत्रकार परिषदेच्या उपाध्यक्षपदी विशाल परदेशी

**मुंबई । प्रतिनिधी**



मराठी पत्रकार परिषदेच्या उपाध्यक्षपदी न्यूज १८ लोकमतचे प्रसिध्द अँकर विशाल परदेशी यांची नियुक्ती करण्यात आली. मुंबई विभागाची जबाबदारी त्यांच्यावर देण्यात आली. परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांनी नांदेड येथे झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीनंतर ही घोषणा केली. विशाल परदेशी हे गेली काही वर्षे परिषदेशी जोडलेले आहेत. मुंबई शाखेचे पदाधिकारी म्हणूनही ते कार्यरत होते. त्यांच्यावर आता राज्य उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. पुढील दोन वर्षे ते उपाध्यक्ष म्हणून काम पाहतील. एस.एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख यांनी विशाल परदेशी यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. रयत समाचार टीमने विशाल परदेशी यांचे हार्दिक अभिनंदन केले.



**देव, देश अन् धर्मापायी ज्या राजाने आपले संपूर्ण आयुष्य खर्ची पाडले, अशा सर्वांसाठी दैवत असलेल्या छत्रपती शिवरायांचे मंदिर होणे, ही अतिशय अभिमानाची बाब असून सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. येथे दर्शनाला येणाऱ्या प्रत्येकाला निश्चितच प्रेरणा मिळणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भिवंडी तालुक्यातील शिवक्षेत्र मराडे पाडा, ता.भिवंडी येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचे (शक्तिपीठ) लोकार्पण झाले. यावेळी स्वामी गोविंद देवगिरीजी महाराज, प.पू. बालयोगी सदानंद बाबा, ह.भ.प डॉ.कैलास महाराज निचिते, राष्ट्रसंत नीलकंठ शिवाचार्य, प.पू. आलोकनाथ महाराज, खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्या मामा, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, आमदार किसन कथोरे, आमदार दौलत दरोडा, आमदार निरंजन डावखरे, आमदार महेश चौघुले आदी मान्यवर उपस्थित होते.**

# महिला सक्षमीकरणासाठी 'अनुभूती' विशेष कार्यक्रम

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

महिला सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत स्वयंसिद्धा फाउंडेशन आणि सहकार भारती, मिरा भाईंदर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने 'अनुभूती महिला सक्षमीकरण काळाची गरज' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने होणारा हा कार्यक्रम २३ मार्च २०२५ रोजी सायं. ३.०० ते ६.०० या वेळेत भाईंदर सेकंडरी स्कूल, उत्तन रोड, भाईंदर पश्चिम येथे संपन्न होणार आहे. कार्यक्रमात महिला सक्षमीकरण काळाची गरज (उद्योजकत्वास पोषक शासकीय योजना), डिजिटल मार्केटिंग, दक्षता ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव ह्या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच नाविन्यपूर्ण व भरीव कामगिरीसाठी महिला संस्था व व्यक्तींचा सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर व्यावसायिक मंच (उत्पादन व विपणन) घोषणा देखील केली जाणार आहे. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन वैशाली आवाडे (महिला प्रमुख महाराष्ट्र प्रदेश) यांच्या हस्ते होणार आहे. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शरदजी जाधव (संगठन प्रमुख महाराष्ट्र प्रदेश) तसेच विशेष निमंत्रित म्हणून भूषणजी पैठणकर, सचिव, महाराष्ट्र प्रदेश, विजयजी जोशी, सचिव, स्वयंसिद्धा फाउंडेशन, डॉ.

स्वयंसिद्धा फाउंडेशन

तेजस्वी शिंदे, पोलीस निरीक्षक, शरदजी गांगल, बँक प्रकोष्ठ प्रमुख महाराष्ट्र प्रदेश, अध्यक्ष टीजेएसबी बँक, डॉ. आदित्य मानके, संचालक, संजीवनी कॅन्सर हॉस्पिटल, मधुसूदनजी पाटील, उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश, आशा बिटाने, उद्योजिका, मंगेश पवार, महामंत्री, मुंबई प्रदेश, प्रवीण बुल्लाख, सह संगठन प्रमुख, राजू ठाणगे, कोकण विभाग प्रमुख, वीणा मोकाशी, कोकण विभाग सह प्रमुख, जया अलीमचांदानी, महिला सहकारी संस्था, महाराष्ट्र प्रदेश, अश्विनी बुल्लाख, हाउसिंग प्रकोष्ठ प्रमुख, महाराष्ट्र प्रदेश, भारती पवार, महिला सहकारी संस्था प्रमुख महाराष्ट्र प्रदेश हेदेखील उपस्थित राहणार आहेत. या भव्य उपक्रमात ५०० हून अधिक महिला उद्योजिकांचा सहभाग अपेक्षित असून, व्यावसायिक संधींबाबत सखोल मार्गदर्शन मिळणार आहे. महिलांना उद्योजकता आणि आत्मनिर्भरतेसाठी प्रेरित करण्यासाठी हा उपक्रम एक महत्त्वपूर्ण मंच ठरेल. महिला उद्योजकांनी आणि इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आयोजकांनी आवाहन केले आहे. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी स्वयंसिद्धाचै विश्वस्त मानसी जोशी, राजेश पाटील, संचाक मेघना गावडे, आराधी ठाकूर, दत्ताराम वाळवणकर, कल्पना उबाळे तसेच निलेश गोसावी, जिल्हा अध्यक्ष, जयेव वाडकर, जिल्हा महामंत्री, किशोर थिटे, जिल्हा संगठन प्रमुख, चारूशिला शेळके, जिल्हा महिला सह प्रमुख, मीरा खोस, जिल्हा बचत प्रमुख, मयुरी घाडगे, जिल्हा बचत सह प्रमुख, सुजाता सकपाळ, जिल्हा हाऊसिंग प्रमुख हे अथक परिश्रम घेत आहेत.

# युवा सेनेने केली छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

## नवनागापूर चौकात शिवस्मारक व शिवस्तंभ उभारण्याचा निर्णय

**अहमदनगर । प्रतिनिधी**

एमआयडीसी, नवनागापूर येथे युवा सेनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीप्रमाणे जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. तर ग्रामपंचायतच्या माध्यमातून नवनागापूर येथे शिवस्मारक व शिवस्तंभ उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी नवनागापूर येथील ग्रामस्थ युवा सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि एमआयडीसीचे कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनागापूर चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन आरती करण्यात आली. यावेळी युवा सेनेचे जिल्हा प्रमुख योगेश गलांडे, आकाश कातोरे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, सरपंच डॉ.बबनराव डोंगरे, शाम पिंपळे, पै. दत्ता तापकिरे, शंकर शेळके, नरेश शेळके, सुनिल शेवाळे, दिपक गिते, विवेक घाडगे, अशोक शेळके, रघुनाथ दांगट, चंद्रभान डोंगरे, अर्जुन सोनवणे, अक्षय पिसे, अमित बारवकर, वैभव सुरवसे, गणेश राईते, अस्लम ईमानदार,



राजू ढगे, सचिन कुलकर्णी, संतोष शेवाळे, स्वप्नील खराडे, नामदेव झेंडे, शशिकांत संसारे, प्रदिप दहातोंडे, अभिजीत सांबारे, रमेश शिंदे, राहुल जगधने, अजिनाथ शिरसाठ, फिरोज शेख, अमोल ठोकळ, महेश जाजगे, वैष्णव गलांडे, चैतन्य कोंबडे, अमोल मेहेत्रे, वसिम शेख, सचिन खेसे, सोमनाथ बारबोले, रामदास कोरडे, अविनाश कर्डिले, किसन तरटे, शिव गलांडे, भास्कर गव्हाणे, भरत दिंडे, अप्पासाहेब बोंबले, रविंद्र पाटील, बाबासाहेब गांगर्डे, महेश शेळके, तुषार शेवाळे, संतोष गायकवाड, महेश थोरवे, भानुदास कुरकुटे, संकेत जराड, नीलेश शेवाळे, नितीन खेसे, राहुल मेहरखांब, पोपट जगताप, अप्पासाहेब पानसंबळ, अमोल घुटे, सोमनाथ आंधळे, सिद्धनाथ पोकळे, इंजी. अन्वर शेख आदी उपस्थित होते. सरपंच डॉ.बबनराव डोंगरे म्हणाले की, समाजाच्या सर्वांगीन विकासासाठी शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन पुढे जावे लागणार आहे. सातत्याने महाराजांच्या कार्याची व विचारांची प्रेरणा मिळण्यासाठी नवनागापूर येथे शिवस्मारक व शिवस्तंभ उभारले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. युवा सेनेचे जिल्हा प्रमुख योगेश गलांडे म्हणाले की, दरवर्षी युवा सेना, एमआयडीसी मधील कामगार नवनागापूर येथे शिवजयंती उत्साहात साजरी करत असतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने अशक्य असे स्वराज्याचे स्वप्न साकारले. सर्वांना समान न्याय देऊन आदर्श राज्य निर्माण केले. त्यांचे कार्य आजही सर्वांसाठी आदर्श असून, त्यांच्या विचारांची प्रेरणा मिळण्यासाठी नवनागापूर येथे उभे राहणाऱ्या शिवस्मारक व शिवस्तंभासाठी सर्व परीने युवा सेनेचे योगदान राहणार आहे. ही वास्तू अधिक भव्य-दिव्य करण्यासाठी योगदान देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

# ऐतिहासिक सरोष कँटीनला आग

**अहमदनगर । प्रतिनिधी**



शहरातील मध्यवस्तीत सरोष पेट्रोल पंप मागे सरोष कँटीन मध्ये भीषण आग लागली. आंतरराष्ट्रीय अवतार मेहेरबाबा केंद्राजवळ असणाऱ्या सरोष कँटीन मधील एका पत्र्याच्या शेडला भीषण आग लागून शेडमध्ये असणाऱ्या फोम गाद्या जळून खाक झाल्या.

यावेळी मेहेरबाबा केंद्रातून सुरवातीला पाण्याचा पाईप लावून आग विझविण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र आग अत्यंत भीषण लागल्यामुळे ती आटोक्यात येत नव्हती त्यानंतर अग्निशमन दलाची छोटी गाडी आली त्या गाडीने आग विझविण्याचा प्रयत्न सुरु केला मात्र हि छोटी गाडी अशी होती कि गाडीचं ऍक्सीलेटर दाबा त्यानंतर पाणी सुरु होतो आणि तोही कमी दाबाने आणि पाइपही छोटा आग मोठी अशी अवघड परिस्थिती निर्माण झाली होती. शेजारी पेट्रोल पंप आणि याठिकाणी आग वाढली असती तर शेजारी शेकडो घरांची वस्ती पेट्रोल पंपाला आग लागून मोठा स्फोट होउन आणखी मोठं नुकसान झालं असत आणि दुसरीकडे आग वाढत असताना अग्निशमन दलाची मोठी गाडी तातडीने दाखल होत असताना या सरोष कँटीन परिसरात मातीचे मोठं-मोठे ढिगारे आणि कचऱ्याचे ढीग टाकून येथे अतिक्रमण करून रस्ते बंद करण्यात आले आहेत.

त्यामुळे या गाडीला येण्यासाठी अडथळे आले. मात्र पेट्रोल पंपाकडून गाडी आत आली आणि अर्धा तास शर्थीचे प्रयत्न करून हि आग विझविण्यात अग्निशमन दलाला यश आले. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही बंद पडलेली दीपाली टॉकीज आणि सरोष कँटीन परिसर याठिकाणी १०० ते १५० ट्रॅक्टर मातीचे ढिगारे टाकून जाणून बुजून रस्ते बंद करण्यात आले असून आज आग लागल्याने या जागेत किती प्रमाणात कचरा आणि मातीचे ढिगारे करण्यात आले असून नगर मनपाने तातडीने याठिकाणी स्वच्छता करावी अशी परिसरातील नागरिकांची मागणी आहे आग लागली त्याच्या शेजारी मेहेर बाबा यांचे आंतरराष्ट्रीय केंद्र असून याठिकाणी अमेरिका, जर्मनी, फ्रांस, इंग्लड, रशिया, इराण आणि जगभरातील मेहेरभक्त येत असतात अशा ठिकाणी आग लागून पुढील मोठा अनर्थ सध्या तरी टळला परंतु मनपा प्रशासनाने याठिकाणी तातडीने स्वछता करणे अत्यावश्यक आहे.

# विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना मिळाला चांगल्या करिअरचा कानमंत्र

## विशेष सेमिनारमध्ये तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन




**अहमदनगर । प्रतिनिधी**

बारावी विज्ञान शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सावेडी येथील माऊली सभागृह येथे विशेष करिअर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थी व पालकांनी भविष्यातील करिअर संधीची माहिती वक्त्यांकडून जाणून घेतली. एम.आय.टी - ए.डी.टी विद्यापीठ पुणे, पी.टी.ए.म अहिल्यानगर व ॲडमिशन सजेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १२ वी विज्ञानच्या विद्यार्थी व पालकांसाठी करिअर मार्गदर्शन सेमिनारमध्ये मान्यवरांनीं बारावीनंतरच्या उपलब्ध संधी, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, आवश्यक कागदपत्रे अशा विविध विषयावर तज्ञ मार्गदर्शक यांच्याकडून सखोल मार्गदर्शन केले. यावेळी एमआयटी ए.डी.टी विद्यापीठाचे प्रा. डॉ. उल्हास माळवदे यांनी संस्थेविषयी माहिती देताना अभियांत्रिकी प्रवेशावेळी मेरिट लिस्ट, लागणारी कागदपत्रे, स्थलांतरित प्रमाणपत्र आदींची जुळवणूक कशा पद्धतीने केली जावी याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. प्रतिभा जगताप यांनी करिअर इन नेव्ही यावर सखोल मार्गदर्शन केले. प्रा. जीवन पाटील यांनी बायो इंजिनीअरिंग या विषयाचे महत्त्व विशद केले. तर प्रा. राहुल ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भाष्य करत एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. घोणसे मॅथ अकॅडमीचे संचालक प्रा. घोणसे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ॲडमिशन सजेशन संचालक अक्षय भंडारी यांनी विद्यार्थ्यांना ऑप्शन फॉर्म कसे भरावे, ब्रांच व कॉलेज कसे निवडावे यावर टिप्स देत. तुम्हाला भविष्यात काय शिकायचे, काय बनायचे आहे हे आधी एकाग्रपणे ठरवा. त्यानंतर पुढील दिशा ठरवा असे नमूद करत सर्वांचे आभार मानले. यावेळी विद्यार्थी व पालकांनी मान्यवरांशी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून संवादही साधला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व सह्याद्री इंटरनॅशनल ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य प्रा. बाळासाहेब कीर्तने , तसेच प्रा. विजय कांडके , प्रा. प्रकाश जोशी , प्रा. नारायण शिनगारे, प्रा. मनोज पाटील, प्रा. प्रसाद चौधरी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# पहिला रोजा : इनायत शेख

**अहमदनगर । प्रतिनिधी**



कापड बाजार येथील इनायत माजिद शेख हिने रमजानचा पहिला रोजा (उपवास) केला. वयाच्या सहाव्या वर्षी रमाजानच्या पवित्र महिन्यात अन्न, पाणी विना तिने उपवास केल्याबद्दल तिचे कौतुक होत आहे. पहाटे तिने सहेरी करुन भक्तीभावाने नमाज अदा केली आणि संध्याकाळी रोजा इफ्तारीने सोडला. तब्बल तेरा तासांहून अधिक काळ तिने निर्जली रोजा ठेवला होता. मुकुंदनगर येथील अल्ताफ इब्राहिम माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक एजाज शेख यांची ती पुतणी आहे. तिने ठेवलेल्या रोजाबद्दल नातेवाईक व परिसरातील नागरिकांनी तिचे अभिनंदन केले.

# पहिला रोजा : आरीज शेख

**अहमदनगर । प्रतिनिधी**



भिंगार येथील आरीज फिरोज शेख याने रमजानचा पहिला रोजा (उपवास) केला. वयाच्या ६ व्या वर्षी त्याने रमाजानच्या पवित्र महिन्यात अन्न, पाणी विना उपवास केला आहे. तब्बल तेरा तासांहून अधिक काळ त्याने निर्जली रोजा ठेवला होता. आरीज हा नासिर शेख यांचा नातू आहे. त्याने केलेल्या रोजाबद्दल नातेवाईक व परिसरातील नागरिकांनी त्याचे कौतुक करुन अभिनंदन केले.



# शिवरायांचे विचार फक्त जयंती पुण्यतिथीच्या दिवशीच न ठेवता कायमपणे स्मरणात पाहिजे- शेंडगे

**अहमदनगर । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी जेवढे बोलू तेवढे थोडे आहे. त्यांनी आपल्या स्वराज्याच्या माध्यमातून त्यांनी आपला आदर्श जगासमोर ठेवला. त्यांनी रयतेच्या कल्याणासाठी आपले सर्व आयुष्य पणाला लावले. त्यामुळे आजप्रत्येक गोष्ट म्हटले की छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव पुढे येते. तसेच स्त्री सन्मानाचा आदर्श समाजापुढे ठेवला, शेतकऱ्यांसाठी ते मदत करत राहीले, असे छत्रपती असे प्रतिपादन माजी महापौर रोहिणी शेंडगे यांनी केले.

बागरोजा हडको मित्र मंडळाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य सजावट करण्यात आली होती. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहरप्रमुख सचिन जाधव, माजी महापौर रोहिणी शेंडगे, संभाजी कदम, संजय शेंडगे, शाम नळकांडे, सचिन शिंदे, सुरेखा कदम, शिलाताई शिंदे, अश्विनी जाधव, वैशाली नळकांडे, खैरे, बाळासाहेब बोराटे, गणेश कवडे, दत्ता कावरे, संदिप दातरंगे, गणेश पिस्का, कैलास शिंदे, सुरेश तिवारी, अण्णा घोलप,दिनकर आघाव आदिंसह मित्र मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते. सचिन जाधव म्हणाले, छत्रपती शिवरायांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतचा प्रत्येक दिवस हा देशासाठी प्रेरणादायी आहे.

ते उत्तम संघटक, प्रशासक होते. राष्ट्र परमवैभवाला नेण्यासाठी शिवराय अंगीकारणे गरजेचे आहे. अशी महान विभूती पुन्हा होणे नाही, अशा शब्दात गौरव केला.

# आदिवासी भिल्ल समाजाचे उपोषण



**अहमदनगर । प्रतिनिधी**

एकलव्य संघटनेच्या विविध मागण्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करताना एकलव्य संघटनेचे जिल्हा अध्यक्ष गीताराम बर्डे समवेत मोहन गोलवाड, अरुण जाधव, वैजंता गोलवाड, सोमनाथ गोरे, आप्पा गोलवाड, दत्ता गोरे, बाबुराव फुलमाळी, किरण माळी, सुभाष माळी, किशोर माळी, जालिंदर माळी आदीसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे निवेदनात म्हटले आहे की, मौजे पाचेगाव येथील गट क्रमांक २८३ मधील आदिवासी भिल्ल समाजाचे अतिक्रमण कायम करण्यात यावे व पिंपरी वळण ता राहुरी येथील गट क्रमांक १९८ मधील सर्व आदिवासी भिल्ल समाजाचे अतिक्रमण कायम करण्यात यावे तसेच येडू आई देवस्थानला जागा उपलब्ध करून देण्यात यावी तसेच आदिवासी समाजाच्या सर्व जमिनी वर्ग एक करण्यात याव्यात व सर्व आदिवासी समाजाला राहत्या जागेत घरकुल व इतर सुविधा देण्यात यावी तसेच जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना आदिवासी विकास निधीचे समान वाटप करण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांना करण्यात आली आहे.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# जनहिताचे प्रश्न जाणून घेण्यासाठी एक एप्रिलपासून दौरा- अॅड. ढाकणे

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

शेवगाव व पाथर्डी तालुक्यांच्या सर्व समस्या जाणून घेऊन त्याबाबतचा विशेष अहवाल तयार केला जाईल. खासदार निलेश लंके यांच्यासमवेत दोन्ही तालुक्यांतील निवडक कार्यकर्त्यांचे शिष्टमंडळ सोबत घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांना भेटून दाद मागणार आहोत. त्यासाठी येत्या एक एप्रिल पासून गावनिहाय मतदार संघाचा दौरा सुरू करणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अॅड. प्रताप ढाकणे यांनी दिली.

शहरातील संस्कारभवन येथे आयोजित कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नासीरभाई शेख, बन्सी आठरे, योगेश रासने, दिगंबर गाडे, वसंत बोर्डे, डॉ. दीपक देशमुख, अॅड. दिनकर पालवे, बंडूशेठ रासने, सीताराम बापू बोरुडे, हुमायून आतार, वसंत खेडकर, रामराव चव्हाण, गणेश चितळकर, राजेंद्र हिंगे, अनिल जाधव, आतिश निऱ्हाळी, किसन देवढे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना ढाकणे म्हणाले, गेल्या शंभर दिवसांत राज्य शासनाचे अस्तित्व कोठेही जाणवले नाही.




> **पराभवाने खचून न जाता लोकांसाठी आंदोलन करणारा, प्रश्न सोडवणारा व त्यातून लोकसंपर्क टिकवणारं ढाकणे यांचं नेतृत्व आपणां सर्वांना जपावं लागेल. सध्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गळा घोटला जात असून हुकूमशाही प्रस्थापित करण्याचा केंद्र सरकारचा डाव आहे. महाराष्ट्राला सर्वसमावेशक नेतृत्वाची गरज आहे. वास्तविक पाहता ही बैठक आमदारांनी घ्यावयास हवी होती परंतु ती प्रतापकाका ढाकणे घेत आहेत.**
>
> **शिवशंकर राजळे -**
> तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस, शरदचंद्र पवार पार्टी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सरकारला घ्यायच्या आहेत असे वाटत नाही. सरकारचे वकील सर्वोच्च न्यायालयात तारीख वाढवून मागतात. गाव पातळीवरची विकास कामे थांबली आहेत. सरकारला वाटते सर्व संस्था आपल्या ताब्यात आहेत, निवडणुकीची एवढी घाई कशाला. प्रशासकाला काही देणे घेणे नसते. सर्वसामान्यांना कोणी कैवारी आहे असे चित्र कुठे दिसत नाही. सत्ता, पदे, अत्यंत चंचल असतात. सत्तेसाठी राजकारण न करता कार्यकर्ता म्हणून लोकांच्या प्रश्नांवर कार्यरत राहणाऱ्याचे नेतृत्व स्वीकारले जाते. लोकांसाठी पुन्हा सक्रिय होत दर सोमवारी पंचायत समिती, तहसील कार्यालयात गरजू लोकांबरोबर संवाद साधत त्यांच्या समस्या सोडवण्याचा आपण प्रयत्न करू.

येत्या काळात कोणती विकासकामांचा कृती आराखडा तयार करून त्यासाठी खासदार निलेश लंके यांच्या माध्यमातून निधीची पूर्तता करण्याचा आपला प्रयत्न असेल. तालुक्यात पाणीटंचाई, चारा टंचाई, जनावरांसाठी पाण्याच्या प्रश्नाबाबत प्रशासनाकडे काहीही कृती आराखडा नाही. प्रशासनावर कुणाचा वचक नसून शेतकऱ्यांविषयी कुणालाही सहानुभूती राहिलेली नाही. आपण येत्या काळात प्रत्येक गावातील दहा नवीन युवकांना प्रशिक्षण देऊन तयार करू. तालुक्यात अतिक्रमणे, खंडणीचे प्रकार व गुन्हेगारी प्रचंड वाढली असून आगामी अधिवेशनात शून्य प्रहरात आमदार रोहित पवार यांच्यामार्फत सभागृहाचे लक्ष वेधले जाईल. खोटे गुन्हे, अॅट्रॉसिटी आणि ट्रॅप खंडणीच्या प्रकरणात तालुक्यात अनेकांना फसवले गेले. लोकांनी मते दिली. सर्वसामान्य जनता संकटात असेल तर, गप्प बसून कसे चालेल. धरणातील पाण्याच्या उपसा मोठ्या प्रमाणावर होऊन आगामी तीन महिने शेती व शेतकऱ्यांसाठी कठीण आहेत. कार्यकर्त्यांना घेऊन संघर्षासाठी सज्ज असल्याचे ढाकणे शेवटी म्हणाले. शिवशंकर राजळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा. गणेश सरोदे यांनी सूत्रसंचालन केले तर शरद सोनवणे यांनी आभार प्रदर्शन केले.

## युवा प्रशिक्षण योजना मुदतवाढ
# मात्र पुढे काय?
## उमेदवारांपुढे रोजगाराचा प्रश्न

**नेवासा । विजय खंडागळे**

कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून द्यावा. राज्य सरकारने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थींना पाच महिन्याची सरकारने मुदतवाढ दिली, याविषयी शासन निर्णय सोमवारी जाहीर करण्यात आला. विधानसभा निवडणुकीपूर्वी सहा महिन्यासाठी नेमणूक करण्यात आली असली तरी शासकीय नोकरीत १०% आरक्षण व पूरक शिक्षण, कायमस्वरूपी रोजगार द्यावा अशी मागणी योजनेतील उमेदवारांकडून आता करण्यात येत आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी तात्कालीन (महायुती) सरकारने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणाची योजना सुरू केली होती या योजनेअंतर्गत युवक युवतींना दहा हजार रुपये मानधन घेऊन विविध शासकीय आणि खाजगी आस्थापनावर रोजगार उपलब्ध करून दिला होता. या योजनेसाठी सहा महिन्याचा कालावधी निश्चित करण्यात आला होता. सहा महिन्याचा कालावधी संपत असल्यामुळे शासनाने १० मार्च रोजी योजनेस पाच महिन्याची मुदतवाढ देण्याचा निर्णय जाहीर केला आहे .यामुळे पुढील पाच महिने युवा प्रशिक्षण योजना सुरू ठेवण्यात आल्याचे दिसून येत आहे.



> **जिल्ह्यात सुमारे दहा हजाराहून अधिक युवक युवती या योजनेत सहभागी झालेले आहेत त्यांना विविध शासकीय नियम शासकीय तसेच खाजगी आस्थापनावर प्रशिक्षणार्थी उमेदवार म्हणून नेमणूक देण्यात आलेले आहे. ता. ९ जुलै २०२४ रोजी शासनाने याविषयीचा शासन निर्णय जाहीर केला होता नगर जिल्ह्यात देखील प्रशिक्षणाची उमेदवाराची नेमणूक प्रक्रिया सुरू करण्यात आली शासनाने या सर्व बाबींचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची मागणी केली जात आहे.**

> **आमचे भविष्य अंधारात आम्हाला वाली कोण? बेरोजकरांची हाक! भाजप सरकारने महायुती सरकारने युवा प्रशिक्षण योजनेस पाच महिन्याची मुदत वाढ दिली असली तरी आमचे कालावधी संपल्यानंतर पुढे काय फक्त प्रमाणपत्र का? याचा उपयोग कुठे याची दिशा सरकारने कायमस्वरूपी स्पष्ट करावी तसे आम्हाला काहीही ठोस निर्णय सांगितलेला नाही, महायुती सरकारने सरकारी नोकरीत दहा टक्के आरक्षण, आणि कायमस्वरूपी बेरोजगाराचा प्रश्न सोडवावा तसेच सध्या कार्यरत असलेले युवक युवती या ट्रेनी म्हणून १००% कामकाजात यशस्वी असून शासनाच्या अवधे पगारापेक्षा कमी वेतनामध्ये हे सुशिक्षित बेरोजगार काम करून शासनाचा पैसा वाचवेल, अशी मागणी युवा प्रशिक्षणार्थी संघटनेने केली.**

# हॉटेल व्यावसायिकावर प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ कडकडीत बंद

## निषेधसभेचे आयोजन, आरोपींना अटक करण्याची मागणी

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील एका हॉटेल व्यवसायिकाला जबर मारहाण झाल्याची घटना घडली असून या हाणामारीत हॉटेल मालकाचा डोळा निकामी झाला आहे. तसेच एकाच्या डोक्यालाही गंभीर इजा झाली आहे. एकाच कुटुंबातील चौघांना झालेल्या गंभीर हाणामारीमुळे रविवारी करंजीत कडकडीत बंद पाळून ग्रामस्थांच्या वतीने या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला व निषेध सभा आयोजित करत मारहाण करून गुंडगिरी करणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली.

याबाबत हॉटेल व्यावसायिक गणेश सुभाष अकोलकर यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, करंजी येथील हॉटेल संकेत या ठिकाणी शनिवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास सलमान पठाण, चिमण साळवे, महेश क्षेत्रे, विवेक बनकर, प्रवीण उर्फ मोन्या साळवे व आसिफ शेख यांच्यात हॉटेलचे बिल देण्यावरून वाद झाला. यावेळी भांडण सोडवण्यासाठी पुढे गेलेल्या राजू रामदास अकोलकर, सचिन ओमकार पांडे, सोमनाथ उर्फ अशोक अकोलकर यांना संबंधित आरोपींनी जबर मारहाण केली. हाणामारीच्या प्रसंगी झालेल्या दगडफेकीत राजू अकोलकर यांच्या डोळ्याला गंभीर इजा झाली असून सचिन ओमकार पांडे, सोमनाथ अकोलकर यांच्या डोक्याला मोठी इजा झाली आहे. त्यानंतर सर्व आरोपींनी तेथून पळ काढला. सलमान पठाण



व त्याच्या टोळीची करंजीसह परिसरात मोठी गुंडगिरी वाढली असून त्याच्यावर अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, हाफ मर्डरचा गुन्हा दाखल करण्यात यावा सर्व आरोपींना तात्काळ अटक करावी या प्रमुख मागणीसाठी रविवारी ग्रामस्थांनी करंजी बंदचे आवाहन करत गुंडगिरी करणाऱ्या आरोपींना पाठीशी घालणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांवर देखील तीव्र शब्दात नाराजी व्यक्त करण्यात आली. यावेळी माजी सरपंच सुनील साखरे, आबासाहेब अकोलकर, माजी चेअरमन अशोकराव अकोलकर, शिक्षक नेते विजय अकोलकर, महादेव अकोलकर, राजेंद्र क्षेत्रे, ज्येष्ठनेते भाऊसाहेब रतन क्षेत्रे, विवेक मोरे, विश्वास क्षेत्रे, ग्रामपंचायत सदस्य राहुल अकोलकर, माजी सरपंच नवनाथ आरोळे, संतोष अकोलकर, देविदास क्षेत्रे, उत्तम अकोलकर, आसाराम अकोलकर, ज्येष्ठनेते रूपचंद अकोलकर यांच्यासह अनेकांनी या बंदचे आवाहन करत आरोपींना कठोर शिक्षा करण्याची मागणी केली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक हरीश भोये ग्रामस्थांची भेट घेऊन म्हणाले, सर्व आरोपींना अटक केली जाईल.

> **तालुक्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हाताबाहेर**
>
> **तालुक्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती हाताबाहेर चालली असून मुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांवर तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याशी चर्चा करून या गंभीर परिस्थितीकडे आपण लक्ष वेधू. अशा प्रकारे गुन्हेगार अवैध धंदेवाले राजरोज उजळ माथ्याने वावरत असतील तर त्याचा बंदोबस्त पोलिसांनी त्वरित करून शांतता व सुव्यवस्था राखावी. सध्या सर्वत्र यात्रा जत्रांचे दिवस आहेत. अचानकपणे कोठेही तणावाचे गालबोट लागू शकते जिल्हा पोलीस प्रमुखांनी कार्यक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.**
>
> **आमदार शिवाजी कर्डिले**

# खो-खो स्पर्धेत पुणे, धाराशिव ठरले अजिंक्य

## मुंबई उपनगर व सांगलीला उपविजेतेपद

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

धाराशिवने सांगलीचा तर पुण्याने मुंबई उपनगरचा पराभव करीत हिरकमहोत्सवी पुरुष व महिला राज्य खो-खो स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले. पुण्याने ही कामगिरी सलग दुसऱ्या वर्षी केली, तर महिला गटामध्ये धाराशिवने यंदा धडाकेबाज कामगिरी करत विजेतेपदावर मोहर उमटवली. थरारक अंतिम सामने- महाराष्ट्र खो-खो असोसिएशन, अहमदनगर खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने व शेवगाव स्पोर्ट्स बहुउद्देशीय फाउंडेशन, सत्यभामा प्रतिष्ठान, मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर शेवगाव येथील खंडोबा क्रिडांगणावर या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महिला गट : धाराशिवचा रोमांचक विजय महिला गटातील अंतिम सामन्यात धाराशिव संघाने सांगलीचा १ डाव १ गुणांनी (११-१०) पराभव केला. पहिल्या डावात सांगली संघाला केवळ ५ गुण मिळवता आले, तर धाराशिवने आक्रमक खेळ करत ११ गुण मिळवले. मध्यंतराला धाराशिवकडे ६ गुणांची आघाडी होती, जी सांगलीला पार करता आली नाही. दुसऱ्या आक्रमणात सांगलीला फक्त ५ गुण मिळवता आले, त्यामुळे



धाराशिव संघाने सहज विजय मिळवला. धाराशिवतर्फे संध्या सुरवसे (३.१०, १.४० मि. संरक्षण व १ गुण), संपदा मोरे (१.२० मि. संरक्षण व २ गुण), अश्विनी शिंदे (१.४०, २.५० मि. संरक्षण व २ गुण), तन्वी भोसले (२.००, २.४० मि. संरक्षण) यांनी उत्कृष्ट खेळ केला. तर सांगलीकडून रितिका मगदूम (१.३० मि. संरक्षण व ५ गुण), प्रतीक्षा बिराजदार (१.१० मि. संरक्षण व १ गुण) यांनी चांगली कामगिरी केली. पुरुष गट : पुण्याच्या विजयाचा सलग दुसरा हंगाम पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात पुण्याने मुंबई उपनगरचा ४ गुणांनी (१८-१४) पराभव केला. मध्यंतराला ३ गुणांची (१०-७) घेतलेली आघाडी पुणे संघाने कायम ठेवली. पुण्याकडून शुभम थोरात (१.५०, २.४० मि. संरक्षण व १ गुण), प्रतीक वाईकर (१.२० मि. संरक्षण व ३ गुण), अथर्व देहेण (१.२०, १ मि. संरक्षण) यांनी चांगला खेळ करत विजयात मोलाची भूमिका बजावली. मुंबई उपनगरकडून निहार दुबळे (२, १ मि. संरक्षण), ओंकार सोनावणे (१, १.२० मि. संरक्षण व २ गुण), अनिकेत पोटे (४ गुण) यांनी चांगली खेळ केला, पण संघाला विजय मिळवता आला नाही. सन्मान आणि पुरस्कार वितरण दरम्यान, स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूंना प्रत्येकी दहा हजार रुपये देऊन गौरविण्यात आले. पुण्याच्या शुभम थोरातला छत्रपती संभाजी राजे व धाराशिवच्या संध्या सुरवसेला राणी अहिल्याबाई पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार : सर्वोत्कृष्ट खेळाडू : शुभम थोरात (पुणे), संध्या सुरवसे (धाराशिव) उत्कृष्ट संरक्षक : अनिकेत चेंदवणकर (मुंबई उपनगर), अश्विनी शिंदे (धाराशिव) उत्कृष्ट आक्रमक : सुयश गरगटे (पुणे), सानिका चाफे (सांगली) या स्पर्धेत खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करत प्रेक्षकांची मने जिंकली.

# मधमाशी हा शेतकऱ्यांचा खरा मित्र- डॉ. विठ्ठल शिर्के

**राहुरी । प्रतिनिधी**

विविध पिकातील परागीभवनामध्ये मधमाशांची भूमिका ही महत्वाची आहे. परदेशात झालेल्या संशोधनानुसार एका एकरात मधमाशांच्या दोन पेट्या ठेवल्या तर त्या क्षेत्रातील धान्य उत्पादनात ५० ते ६० टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे. मधमाशांमुळे अन्नधान्याचे उत्पादन वाढून शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होतो. यामुळे मधमाशा या शेतकऱ्यांचा खरा मित्र असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे विद्यापीठाचा कृषि किटकशास्त्र विभाग, महाराष्ट्र शासनाचा कृषि विभाग व नवी दिल्ली येथील राष्ट्रीय मधमाशीपालन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मधुमक्षिका पालन व मध अभियान




२०२४-२५ अंतर्गत दि. १७ ते २३ मार्च, २०२५ या कालावधीत शास्त्रोक्त मधमाशीपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कृषि किटकशास्त्र विभागातील परिसंवाद कक्षात झालेल्या या प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन डॉ. विठ्ठल शिर्के बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषि किटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उत्तम कदम, अहिल्यानगर येथील कृषि उपसंचालक सागर गायकवाड, नाशिक येथील सुकृती मधूशालेचे संचालक डॉ. तुकाराम निकम व राहुरीचे तालुका कृषि अधिकारी बापुसाहेब शिंदे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. विठ्ठल शिर्के पुढे म्हणाले की मधमाशांचे जीवन आपणा सर्वांसाठी मार्गदर्शक ठरणारे आहे. मधमाशा या सतत कार्यमग्न राहुन आपले काम चोखपणे करत असतात. अशाच प्रकारे सर्व शेतकरी बंधुंनी एकमेकांना सहाय्य करुन शेतीत उत्कर्ष साधावा. शेतीचे खरे मुळ हे सहजीवनात आहे.

मार्गदर्शन करतांना डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले की मधमाशा या निसर्गचक्रातील महत्वाचा घटक आहे. मधमाशांद्वारे संपूर्ण निसर्गाचा समतोल राखण्याचे महत्वाचे काम होते. विविध प्रकारच्या महत्वाच्या वनस्पतींचे अस्तित्व या मधमाशांवर अवलंबून आहे. शेतीमधील युवकांना शेतीपूरक उद्योग उभारण्यासाठी मधुमक्षिकापालन हा चांगला पर्याय ठरु शकतो असे यावेळी ते म्हणाले. डॉ. तुकाराम निकम आपल्या मनोगतात म्हणाले की मधमाशी म्हणजे शेतकरी तसेच शेतीचा आत्मा होय. मधमाशी म्हणजे समृध्दी. जलसिंचनाएवढेच परागसिंचन महत्वाचे आहे. हरित क्रांतीनंतर आता मधुक्रांती होण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. सागर गायकवाड यावेळी म्हणाले की सध्या फळबागांखाली क्षेत्र वाढत आहे. या फळबागांमधून जास्तीचे उत्पादन मिळावे व त्यात सातत्य राहावे यासाठी मधुमक्षिकापालन महत्वाचे ठरणार आहे. त्यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना या शास्त्रोक्त मधमाशीपालन प्रशिक्षणाचा जास्तीत जास्त फायदा घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. उत्तम कदम यांनी केले. यावेळी डॉ. तुकाराम निकम यांनी तयार केलेल्या मधुप्रतिज्ञेचे वाचन डॉ. नंदकुमार भुते यांनी करुन उपस्थितांना मधुप्रतिज्ञा दिली. या कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन डॉ. नंदकुमार भुते यांनी तर आभार डॉ. पल्लवी पाळंदे यांनी मानले. यावेळी राहुरी मंडळ कृषि अधिकारी अशोक गिरगुणे, वांबोरीचे मंडळ कृषि अधिकारी रामहरी मिसाळ, ब्राम्हणीचे कृषि सहाय्यक शुभम कदम, किटकशास्त्र विभागातील शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. या प्रशिक्षणासाठी सात तालुक्यातील शेतकरी सहभागी झाले आहेत.

# बंधने फक्त महिलांवरच का ?

आज २१ व्या शतकात पुरुष आणि महिला असा कोणताच भेद राहिला नाही. आज महिलाही पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. असे कोणतेच क्षेत्र नाही जिथे महिला पुरुषांची बरोबरी करू शकत नाही. कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे मात्र समाजात आजही असा एक घटक आहे ज्यांना महिलांची ही प्रगती खटकत आहे. आजही तो घटक महिलांना केवळ चूल आणि मूल या पुरतच मर्यादित ठेवू इच्छितो म्हणूनच हे सनातनी विचारांचे प्रतिगामी लोक महिलांना सतत या ना त्या कारणांहून ट्रोल करत असतात. कधी ते महिलांच्या केशभूषे वरून ट्रोल करतात तर कधी ते महिलांना त्यांच्या वेशभूषेवरुन ट्रोल करतात. आजच्या मुली मुलांप्रमाणे कपडे घालतात, जीन्स पॅन्ट टी शर्ट घालतात त्यांच्या जीन्स पॅन्ट गुडघ्यावर फाटलेल्या असतात याचा त्यांना राग येतो तर कधी मुलींच्या नटण्या मुरडण्याचा त्यांना राग येतो. महिलांना ट्रोल करण्यात समाजातील प्रतिष्ठित घटकही मागे नसतात. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात हे कसले संस्कार असे ? असा प्रश्न मध्यंतरी उत्तरांचलच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत विचारला होता. केवळ हेच महाशय नाही तर अनेकजण महिलांच्या वेशभूषेवरुन महिलांना टार्गेट करत असतात वास्तविक कोणी कोणते कपडे वापरायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. सार्वजनिक ठिकाणी गुडघ्यावर फाटलेली जीन्स पॅन्ट फक्त महिलाच घालतात का? पुरुषही फाटलेली जीन्स घालतात. बरमुडा किंवा शॉर्ट पॅन्ट घालून गावभर फिरतात पण त्यांच्या कपड्यावर कोणीच आक्षेप घेत नाही. म्हणजे पुरुषांनी कसलेही कपडे वापरले तरी चालेल मात्र महिलांना ते स्वातंत्र्य नाही. महिलांना मात्र त्यांच्या आवडीचे कपडे घालायला बंदी. मग प्रश्न येतो बंधने फक्त महिलांवरच का? महिलांनी कोणते कपडे घालावेत हे ठरवण्याचा अधिकार पुरुषांना कोणी दिला? महिलांनी कोणते व कसे कपडे घालावेत, महिलांनी कोठे फिरावे, काय खावे, काय प्यावे हे पुरुषांनी ठरवावे ही तर अठराव्या शतकातील मानसिकता झाली. २१ व्या शतकातही महिलांना समान अधिकार मिळत नाही त्यांना त्यांच्या अधिकारासाठी झगडावे लागते ही दुर्दैवाची बाब आहे. स्त्री पुरुष समानता ही फक्त बोलण्यापूरतीच आहे हेच या मानसिकतेतून दिसून येते. जगात एकीकडे महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठी चळवळ उभी केली जात आहे तर आपल्याकडे महिलांनी कसे राहायचे, तिने कोणते कपडे घालायचे, कसे कपडे घालायचे यावर चर्चा केली जाते. प्रश्न महिलांनी कसे आणि कोणते कपडे घालायचा हा नसून प्रश्न त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा आणि महिलांच्या मानवी हक्काचा आहे. हे हक्क कोणीही हिरावून घेऊ नये. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात, तोकडे कपडे घालतात म्हणून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होतात असा तर्क लढवला जातो. महिला संध्याकाळी बाहेर फिरायला जातात म्हणून त्यांच्यावर बलात्कार होतात असाही दावा तथाकथित संस्कृती रक्षक करतात पण ते सोयीस्करपणे हे विसरतात की आपल्या देशात अंगभर कपडे घातलेल्या साठ सत्तर वर्षाच्या वृद्धेवर देखील बलात्कार होतो. विकृत मानसिकता असलेले लोक अंगभर कपडे घातलेल्या महिलांकडे देखील विकृत नजरेने पाहतात. अंगभर कपडे असोत की तोकडे कपडे असोत ज्यांची मानसिकता विकृत आहे त्या नराधमांना महिला केवळ भोगवस्तू वाटते. महिलांच्या कपड्यांवर भाष्य करण्याऐवजी ही पुरुषी मानसिकता बदलली तर देशात महिला अत्याचाराच्या घटना घडणार नाही.


प्रौढ शिक्षणवर्ग


श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

# साध्वी सोनाली यांनी जिंकली कोपरगांवकरांची मने

## माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या तिसऱ्या पुण्यस्मरणानिमीत्त रामकथेस सुरुवात

**कोपरगाव । किसन पवार**

प्रसन्नमय भक्तीभावाचे वातावरण, कार्यक्रमाचे भव्यदिव्य व्यासपिठ, सजविलेल्या बग्गीतुन साध्वींची मिरवणुक साथीला डोक्यावर मंगल कलश घेवुन चालणाऱ्या कुमारीका-महिला, फुलांची मुक्त उधळण व फटाक्यांची आतषबाजी, सनई चौघडा-संबळ-बँड पारंपारीक वाद्याच्या तालावर नाचण्याचा मनमुराद आनंद घेणारे भाविक, रामकथेस लयबध्द संगित आणि पात्रांची झांकी बहारदरपणे सादर करणारा साध्वींचा समुहसंच, चकलंबा कल्याणस्वामी महिला वारकरी शिक्षण संस्थेच्या पंचवीस विद्यार्थीनींचा लयबध्द टाळ मृदुंगाचा निनाद दिमतीला संजीवनीची यंत्रणा अशा सगळ्या भक्तीमय वातावरणांत चकलंबाच्या साध्वी सोनाली कर्पे यांनी पहाडी आवाजातुन कोपरगांवकरांची मने पहिल्याच दिवशी जिंकली, राम आणि रावण या व्यक्ती आणि प्रवृत्ती कशा होत्या, जीवन जगण्याचं शास्त्र आणि सुत्र याची शिकवण रामायणांतुन मिळते असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमस्थळी माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या चित्ररूपी विकासाची छायाचित्रे, रामायणातील चित्रीत केलेले मुख्य प्रसंग, अयोध्येतील हुबेहुब श्रीरामाची प्रतिकृती अनेकांचे लक्ष वेधुन घेत होती.



सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक, माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या तिसऱ्या पुण्यतिथीनिमीत्त ज्ञानेश्वरनगर तहसिल कार्यालय मैदान कोपरगांव येथे सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे विचारधारा ट्रस्ट व संजीवनी उद्योग समुह, संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या सहकार्याने प्रभु श्रीरामकथा सोहळयाचे १६ ते २३ मार्च दरम्यान आयोजन करण्यांत आले त्याचे पहिले पुष्प गुंफतांना साध्वी सोनाली बोलत होत्या.

प्रारंभी संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे व माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी उपस्थितांचे स्वागत केले, संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नितीन कोल्हे, त्यांच्या पत्नी कलावती कोल्हे,संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टीटयुटचे कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे,सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे,कोपरगांव तालुका स्वयंसहायता महिला बचतगटाच्या अध्यक्षा रेणुका कोल्हे,श्रद्धा कोल्हे आदींची उपस्थिती होती. यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते रामायण ग्रंथ व साध्वी सोनालीदिदी यांचे विधीवत पुजन करण्यांत आले.स्व.शंकरराव कोल्हे यांच्या प्रतिमेचे पूजन जेष्ठ नेते दत्तूनाना कोल्हे,सुरेश कोल्हे, व्हा. चेअरमन राजेंद्र कोळपे यांनी केले.

संत तुकाराम महाराज बीज निमित्ताने जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून ह.भ.प.स्व. गणपत महाराज लोहाटे यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी सभापती व सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे विचारधारा ट्रस्टचे उपाध्यक्ष मच्छिंद्र टेके यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करून माजीमंत्री स्व.शंकरराव कोल्हे यांचा कार्यकाळ व त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

साध्वी सोनाली पुढे म्हणाल्या की, जीवनाची सुरूवात आणि शेवटही राम नामानेच आहे, मधल्या प्रवासात राम आठवला तर आराम आहे नाही आठवला तर हराम आहे. आज प्रत्येकाची मनं साभोवतालच्या वातावरणांमुळे गढूळ झाली आहे, माणूस मन आणि माणूसपण हरवत चालला आहे, त्रेतायूगापासून सुरू असलेले रामायण अद्यापही जुने झालेले नाही. व्यवहार, कृती, जीवन कसं जगावं याची शिकवण रामायणातुन मिळते.

स्व. शंकरराव कोल्हे कर्तृत्ववान, संघर्षशील, जनसेवेचे वारकरी, राज्याच्या राजकारणांतील विकासपुरूष, धैर्यशील, शेती आणि पाणी या घटकासाठी त्यांनी उभं आयुष्य खर्ची घालत शेतक-यांची आर्थीक क्रयशक्ती वाढविण्यांत ते वाकबगार होते, जे प्राप्त केलं ते सहज मिळवलं नाही तर संघर्षातुन संजीवनी नावाचं साम्राज्य उभं करत अनेकांचे संसारप्रपंच फुलविले.

# सरकारी मीडिया मॉनिटरिंग खासगी संस्थेकडे देण्याच्या निर्णय रद्द करा

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

महाराष्ट्र सरकारने वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमांवरील बातम्यांचे संकलन व विश्लेषण करण्याचे काम खासगी संस्थेला देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय पत्रकारितेच्या मूलभूत तत्वांना आणि लोकशाही मूल्यांना बाधा आणणारा असून, माध्यम स्वातंत्र्यावर गंभीर आघात करणारा आहे. पत्रकारितेचा मुख्य हेतू जनतेपर्यंत सत्य व वस्तुनिष्ठ माहिती पोहोचवणे हा आहे. मात्र, सरकारकडून या कामासाठी खासगी संस्था नेमण्याचा निर्णय घेतल्याने बातम्यांवर अप्रत्यक्ष सेन्सॉरशिप लादली जाण्याचा धोका आहे. हा निर्णय सरकारविरोधी मतप्रवाह दडपण्याचा आणि प्रसारमाध्यमांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते.



देशाच्या लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आणि पत्रकारितेच्या स्वतंत्र भूमिकेचे संरक्षण करण्यासाठी आम्ही महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई या निर्णयाला तीव्र विरोध करतो आहोत. सरकारने पारदर्शकता न ठेवता खासगी संस्थेला हे काम सोपवणे म्हणजे माध्यमांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रयत्न आहे. सरकार कडून जाहीर केलेला निर्णय त्वरित मागे घ्यावा.

आमच्या मागण्यांची दखल पुढील आठ दिवसांत न घेतल्यास आम्ही मंत्रालयाबाहेर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलने करू. ही बाब पुरोगामी महाराष्ट्रात घडू नये असे आम्हाला वाटते यासाठी आमच्या मागण्यांचा गंभीर्यपूर्वक विचार करून राज्य सरकारने खाजगी संस्थेमार्फत मीडिया मॉनिटरिंग करण्याचा घेतलेला निर्णय त्वरित मागे घ्यावा अशा आशयाचे निवेदन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मा. गोविंद वाकडे, राज्य संघटक संजय भोकरे, राज्य सरचिटणीस डॉ विश्वास आरोटे यांच्या सुचनेनुसार व जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ श्रीगोंदा यांनी तहसीलदार क्षितिजा वाघमारे यांना दिले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष माधव बनसुडे,. पीटर रणसिंग, तालुका उपाध्यक्ष मेजर भिमराव उल्हारे,विजय उंडे,संघटक अमर घोडके,सचिव डॉ अमोल झेंडे,मा.तालुकाध्यक्ष अंकुश शिंदे, शहराध्यक्ष नितीन रोही, पत्रकार राजेंद्र राऊत, श्रीरंग साळवे, शिवाजी साळुंके, सुभाष शिंदे,उज्वला उल्हारे,वैभव हराळ,प्रमोद आहेर,विजय मांडे,सचिन शिंदे, अंकुश तुपे,अनिल तुपे, प्रवक्ते किशोर मचे यांच्या सह पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जमीन एकत्रिकरण योजना चुका तात्काळ दुरुस्त करा

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

महाराष्ट्र सरकारने सन १९७० दरम्यान तुकडे जोड-तुकडे बंदी कायदा अंमलात आणला. शेतकऱ्यांचे ठीक ठिकाणी असलेल्या जमिनीच्या तुकडे एकत्र करून सलग क्षेत्र देण्यात आले मात्र त्याचवेळी जुने सर्वे नंबरचे नविन गट नंबर तयार झाले त्यावेळी अनेक शेतकरी अडाणी, अशिक्षीत असल्याने एकत्रीकरण योजना कागदपत्र तयार करताना लेखी जबाब-मोजणी-ताबे-पावती-गटाचे नकाशे कागदपत्रे फक्त कागदावर झाले, मात्र बरेच प्रकरणात प्रत्यक्ष मालकी वहीवाटी जुने सर्व्हे नंबर प्रमाणेच राहीले. अनेक शेतकऱ्यांनी जुने सर्व्हे नंबर प्रमाणे जमिनीत घरे बांधली, विहीर-बोअरवेल घेतले-गुंतवणूक वाढली. त्यातच काही प्रकरणात क्षेत्र कमी जास्त झाले त्यावरुन भविष्यात महसूल व दिवाणी कोर्टात वाद सुरू झाले. अनेक वादग्रस्त प्रकरणे महसूल-मंत्रालय-उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालये व नामदार हायकोर्ट येथे गेले, ५० वर्षापासून प्रकरणे प्रलंबित आहेत. अन्यायग्रस्त शेतकरी, सरकारी (महसूल) चुकांमुळे पिचून गेले आहेत. त्यांची तातडीने सुटका व्हावी म्हणून श्रीगोंदा तालुक्यातील एकत्रिकरण योजनेत चुका झालेली सर्व प्रकरणे शोधून ती तातडीने - प्राधान्याने निकाली काढावीत म्हणून शेतकरी हितासाठी अॅड. संभाजी बोरुडे यांनी ता. १२ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रशासनास निवेदन दिले होते. त्या निवेदनाची प्रशासनाने दखल घेतली नाही म्हणून अॅड संभाजी बोरुडे यांनी अन्यायग्रस्त शेतकऱ्यांसह ता. १० मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजलेपासुन श्रीगोंदा तहसिल कचेरी समोर जनआंदोलन सुरु केले .

# समाजहितासाठी समाजकार्याचा गौरवशाली वारसा

## १८ मार्च जागतिक समाजकार्य दिन । शाश्वत कल्याणासाठी पिढीगत एकात्मतेला बळकटी देणे

**दरवर्षी मार्च महिन्याच्या तिसऱ्या मंगळवारी संपूर्ण जगभर जागतिक समाजकार्य दिन साजरा केला जातो. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ सोशल वर्कर्स आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या मान्यतेने हा दिवस १९८३ पासून नियमितपणे साजरा केला जात आहे. समाजकार्याचे महत्व अधोरेखित करणे, समाजाच्या सर्व स्तरांवर सामाजिक कार्याचा प्रसार करणे आणि विशेषतः युवकांना समाजकार्याच्या व्यावसायिक अभ्यासक्रमात सामील होण्यासाठी प्रेरित करणे हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे. यावर्षी ता. १८ मार्च रोजीजगभरात जागतिक समाजकार्य दिन साजरा केला जात आहे.**


सॅम्युअल वाघमारे
सीएसआरडी
८७८८४१२७८०
प्रासंगिक

यावर्षीचा जागतिक समाजकार्य दिनाचा मुख्य विषय शाश्वत कल्याणासाठी पिढीगत एकात्मतेला बळकटी देणे आहे. या विषयाचा उद्देश विविध पिढ्यांमधील सहकार्य, एकात्मता आणि परस्पर सन्मान वाढवणे, तसेच समाजाच्या स्थैर्यासाठी अनुभव आणि ज्ञानाचे हस्तांतरण करणे हा आहे. समाजाच्या भल्यासाठी वेगवेगळ्या वयोगटांतील व्यक्तींनी एकत्र येऊन कार्य करणे हे शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते. भारतासमोर सामाजिक समस्यांची व्याप्ती बघता अनेक सद्यस्थितीत अनेक आव्हाने आहेत. वाढती गरिबी, लैंगिक असमानता, बाल सुरक्षा व बालकामगार, महिला अत्याचार, शिक्षणाचा अभाव, ग्रामीण भागातील आरोग्यसेवेच्या समस्या, बेरोजगारी, व्यसनाधीनता, दिव्यांग कल्याणाच्या

समस्या, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे विस्थापन यांसारख्या असंख्य समस्यांमुळे समाजाच्या मोठ्या घटकाचे जीवनमान खालावत आहे. शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या पातळीवर अनेक योजना राबवल्या जात असल्या तरी समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत त्या प्रभावीपणे पोहोचण्यासाठी प्रशिक्षित समाजकार्यकर्त्यांची आवश्यकता तीव्रतेणे भासत आहे.समाजकार्य हे केवळ गरिबांसाठी काम करण्यापुरते मर्यादित नाही तर समाजाच्या सर्व स्तरांवर सामाजिक समतोल राखण्याचे कार्य समाजकार्यकर्ते करतात. विविध शासकीय आणि स्वयंसेवी संस्था, कंपन्यांचे सीएसआर उपक्रम, सामाजिक धोरणे ठरविणारी मंडळे आणि जागतिक स्तरावरील सामाजिक संघटना यामध्ये समाजकार्याचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांचे योगदान समाजासाठी अत्यंत मोलाचे ठरत आहे. समाजकार्य हे आता एक व्यावसायिक शिक्षण व करिअर बनले आहे. पूर्वी समाजकार्य हे केवळ स्वयंसेवेच्या स्वरूपात अस्तित्वात होते. मात्र, वाढत्या सामाजिक गरजांमुळे समाजकार्याचा शैक्षणिक दर्जा वाढला आहे आणि त्याची व्यावसायिकता सिद्ध झाली आहे. भारतामध्ये १९३६ मध्ये मुंबईतील नागपाडा नेबरहुड हाऊसमध्ये टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या पुढाकाराने समाजकार्याच्या औपचारिक शिक्षणाची सुरुवात झाली. आज देशभरात ६५० हून अधिक महाविद्यालयांमध्ये समाजकार्य शिकवले जाते.

दरवर्षी हजारो विद्यार्थी बीएसडब्ल्यू आणि एमएसडब्ल्यू पदवी प्राप्त करून समाजकार्याच्या विविध क्षेत्रांमध्ये योगदान देतात. समाजकार्याच्या शिक्षणानंतर विद्यार्थी समाजकल्याण, महिला व बालविकास, आदिवासी कल्याण, ग्रामीण विकास, आरोग्य, शिक्षण, कंपन्यांचे सीएसआर प्रकल्प, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत असणारे स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संशोधन अशा विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत. होतात. आज शासकीय आणि खासगी अश्या दोन्ही क्षेत्रात समाजकार्याला मोठी मागणी आहे. भारतामध्ये समाजकार्य प्रशिक्षण देणाऱ्या काही प्रमुख संस्थापैकी अहिल्यानगर येथील सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था हि एक नामांकित शिक्षण संस्था आहेत. समाजकार्य शिक्षणाच्या क्षेत्रात या संस्थेने मोठे योगदान दिले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या या संस्थेने नुकतेच समाजकार्य शिक्षणाच्या ५० वर्षांचे यशस्वी पर्व पूर्ण केले आहे. ही संस्था ग्रामीण विकास, जलसंधारण, महिला सबलीकरण, आरोग्यसेवा, शिक्षण, बालविकास आणि आदिवासी विकास अशा अनेक क्षेत्रांमध्ये संशोधन व नाविन्यपूर्ण प्रकल्प राबवत आहे. संस्थेचे विद्यार्थी विविध शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था, सीएसआर विभाग आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय सामाजिक उपक्रमांमध्ये कार्यरत आहेत. या संस्थेने आजपर्यंत अनेक नामवंत समाजकार्यकर्ते घडवले असून, त्यांचे योगदान सामाजिक परिवर्तनात महत्त्वपूर्ण ठरत आहे. आजच्या घडीला समाजातील असंख्य समस्यांसमोर ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. यासाठी युवकांनी समाजकार्य हे करिअर म्हणून स्वीकारावे आणि समाजाच्या प्रगतीत आपली भूमिका बजवावी. समाजातील दुर्बल घटकांसाठी न्याय मिळवून देण्यासाठी तसेच त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी व्यावसायिक समाजकार्य हा प्रभावी मार्ग ठरू शकतो. समाजकार्य हे केवळ स्वयंसेवेसाठी नाही, तर हा एक व्यावसायिक अभ्यासक्रम आणि करिअरचा पर्याय आहे. समाजकार्यात केवळ संवेदनशीलता असून चालत नाही, तर त्याला व्यावसायिक कौशल्य, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि धोरणात्मक विचारसरणीची जोड द्यावी लागते. समाजातील बदलत्या गरजांनुसार समाजकार्याचे क्षेत्र अधिक व्यापक होत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटलमीडियाचाप्रभाव, सीएसआरडी क्षेत्राचा विस्तार आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सामाजिक समस्या यामुळे प्रशिक्षित समाजकार्यकर्त्यांची मागणी वाढत आहे. समाजकार्यकर्ते केवळ मदतीसाठीच काम करत नाहीत, तर ते धोरण ठरविणाऱ्या संस्थांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. आजच्या युवकांनी समाजकार्याच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी पुढे यावे, कारण समाजाला संवेदनशील, व्यावसायिक आणि प्रयोगशील समाजकार्यकर्त्यांची नितांत आवश्यकता आहे. युवकांनी सेवा परमो धर्मः या तत्त्वाने प्रेरित होऊन होऊन समाजकार्याला करिअरचा एक गंभीर आणि जबाबदार पर्याय म्हणून स्वीकारणे गरजेचे आहे. समाजकार्य हा केवळ एक व्यवसाय नाही, तर समाजाच्या उत्कर्षासाठी चाललेली चळवळ आहे. जागतिक समाजकार्य दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने समाजकार्यास हातभार लावण्याचा संकल्प करावा. व्यावसायिक समाजकार्य हे समाजपरिवर्तनासाठी अपरिहार्य असून, युवकांनी त्याचा एक भाग बनून सामाजिक न्याय आणि समतेसाठी पुढाकार घेणे काळाची गरज आहे. सामाजिक बांधिलकी, नवी दृष्टी आणि व्यावसायिक कौशल्यांचा वापर करूनच समाजकार्य हा समाजपरिवर्तनाचा प्रभावी मार्ग ठरू शकतो. त्यामुळेच, आजच्या युवकांनी समाजकार्याला केवळ करिअर म्हणून नव्हे, तर एक सामाजिक जबाबदारी आणि परिवर्तनाचे साधन म्हणून स्वीकारावे.